# प्रस्तावना

**प्रस्तावना :**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे कोल्हापूरमधील एक नामवंत महाविद्यालय असून ते रयत शिक्षण संस्थेच्या ध्येयधोरणानुसार सुरू आहे. या महाविद्यालयाने समाजसेवेचे व्रत स्विकारले आहे. अतिशय प्रतिकूल परिस्थितीमध्ये सुरू झालेल्या या महाविद्यालयाने आज नेत्रदिपक असे यश मिळवले आहे.

महाविद्यालयाच्या प्रस्तावित जागेसमोर अवैधरित्या उभारलेली झोपडपट्टीही होती. तर जवळच मोठ्या जनावरांचा कत्तलखाना होता. तरीही आजूबाजूच्या गलिच्छ वातावरणाकडे दुर्लक्ष करून या महाविद्यालयाने आपले शैक्षणिक कार्य सुरू ठेवले आहे. सामाजिक बांधिलकीचे तत्त्व स्विकारून झोपडपट्टीतील मुलांना शाळा महाविद्यालयामध्ये पाठविण्यास प्रोत्साहन देणे, दलित वस्तीमध्ये स्वच्छता व प्रबोधनाचे कार्यक्रम घेणे, गरीब-गरजू विद्यार्थ्यांसाठी महाविद्यालयातर्फे विविध शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देणे इ.उपक्रमाद्वारे महाविद्यालयाने आपला वेगळा ठसा उमटवलेला आहे.

सुरूवातीला फक्त कला शाखेचे शिक्षण देणाऱ्या या महाविद्यालयामध्ये कला, वाणिज्य, विज्ञान शाखेच्या कनिष्ठ व वरिष्ठ वर्गांचे शिक्षण दिले जात आहे. त्याचप्रमाणे बदलत्या काळानुसार आवश्यक विविध अभ्यासक्रम समाजाभिमुख उपक्रमही या महाविद्यालयामध्ये राबविले जात आहेत.

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयामध्ये 'कमवा व शिका' ही योजना राबविली जाते. या योजनेमधून श्रमाचे महत्त्व वाढविले जाते. या योजनेमध्ये काम करून अनेक विद्यार्थ्यांनी आपले महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केलेले आहे. आज त्यातील अनेक विद्यार्थी विविध क्षेत्रामध्ये मोठ्या पदांवर कार्यरत आहेत. गरीब आणि

निराधार युवकांना शिक्षणाची संधी देवून सदर महाविद्यालयाने शैक्षणिक व सामाजिक क्षेत्रामध्ये आपला वेगळा ठसा उमवटलेला आहे. 'कमवा व शिका' या योजनेतून 'स्वावलंबन', सामाजिक एकता इ.मूल्यांचा विकास घडवून आणला जातो.

महाविद्यालयाने कबड्डी व मल्लविद्या या भारतीय क्रिडाप्रकारामध्ये मोठी लक्षणिक कामगिरी केलेली आहे. मल्लविद्या या विभागात विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय स्तरापर्यंत यश मिळवलेले आहे. तर कबड्डीमध्ये विद्यापीठ चॅम्पीयनशीप अनेकवेळा प्राप्त केलेली आहे. कबड्डी व कुस्ती म्हणजे शाहू महाविद्यालय असे समीकरण विद्यापीठ क्षेत्रामध्ये बनून गेले आहे.

'कमवा व शिका योजना', विद्यार्थी दत्तक योजना, समृद्ध ग्रंथालय, पारंपरिक खेळातील नैपुण्य, वसतिगृह, महाविद्यालयामध्ये कार्यरत असलेला माजी विद्यार्थी संघ ही इतर महाविद्यालयापेक्षा वेगळी वैशिष्ट्ये येथे आहेत. म्हणून संबंधित विषय एम.फिल. शोधप्रबंधासाठी निवडण्यात आला असून त्या माध्यमातून कर्मवीर भाऊराव पाटील यांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान व महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती क्रिडाप्रकारातील यश इत्यादी बाबी समजावून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे.

**संशोधनाची उद्दिष्ट्ये :**

१. राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालयाच्या विकासाचे ऐतिहासिक परिक्षण करणे.

२. ग्रामीण भागातील गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांच्या विकासामध्ये महाविद्यालयाच्या योगदानाचा अभ्यास करणे.

३. महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा अभ्यास करणे.

४. पारंपरिक खेळाच्या विकासात महाविद्यालयाच्या योगदानाचा आढावा घेणे.

५. 'कमवा व शिका' या क्रांतीकारी योजनेची फलश्रूती तपासणे.

६. महाविद्यालयाच्या सर्वांगिण विकासामधील त्यागी व्यक्ती व रयत शिक्षण संस्थेच्या भूमिकेचा चिकीत्सक अभ्यास करणे.

**संशोधन पद्धती :**

या अभ्यासासाठी ऐतिहासिक संशोधन पद्धतीचा वापर करून त्याच्या अभ्यास पद्धतीमध्ये वर्गीकरण व विश्लेषण यांचा उपयोग केला गेला आहे. यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाची साधनसामुग्री उपयोगात आणलेली आहे. संकलीत वस्तूनिष्ठ माहितीच्या आधारे निष्कर्ष काढण्याचा प्रयत्न प्रस्तूत संशोधनात करण्यात आलेला आहे.

**व्याप्ती आणि मर्यादा :**

महाविद्यालयाच्या शैक्षणिक प्रगतीचा, महाविद्यालयातील विविध उपक्रमांचा, योजनांचा, क्रिडाक्षेत्रातील कामगिरीचा आढावा घेणे, यासाठी उपलब्ध साधन सामुग्रीचे काळजीपूर्वक अध्ययन करून राजर्षी शाहू महाविद्यालयाच्या कार्याचे परीक्षण करणे एवढ्यापुरतेच हे संशोधन मर्यादित आहे.

**महत्त्व :**

राजर्षी छत्रपती शाहू महाविद्यालय हे कोल्हापूरमधील रयत शिक्षण संस्थेचे एकमेव महाविद्यालय आहे. नॅक मूल्यांकनानंतर या महाविद्यालयास $B^+$ दर्जा मिळालेला आहे. स्वावलंबी व स्वस्त शिक्षण हे या महाविद्यालयाचे वेगळे वैशिष्ट्ये आहे. महाविद्यालयात 'कमवा व शिका' या योजनेमुळे अनेक गरीब कुटुंबातील विद्यार्थ्यांना काम करत शिक्षण घेता येत आहे. जेणेकरून हे विद्यार्थी शिक्षणाचा व स्वत:चा खर्च भागवू शकतात.

कित्येक ग्रामीण भागातील हुशार विद्यार्थ्यांना पैशाच्या अडचणीमुळे शिक्षण घेता येत नाही. परंतु महाविद्यालयातील वसतीगृह व 'कमवा आणि शिका' योजनेमुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणाची संधी मिळाली आहे. नापासांची शाळा, भरतीपूर्व प्रशिक्षण, मुक्त विद्यापीठ शिक्षणाची सोय, पारंपरिक खेळांसाठी दिले जाणारे प्रोत्साहन आदि महाविद्यालयांच्या अशा वेगळ्या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकास होण्यास मदत होते. पारंपरिक खेळातील नैपुण्य हे या महाविद्यालयाचे वेगळे वैशिष्ट्ये आहे. मल्लविद्येला प्रोत्साहन देण्याचे कार्य हे महाविद्यालय करत आहे. या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्रिडा क्षेत्रामध्ये आंतरराष्ट्रीय पातळीवर नेत्रदिपक यश मिळविले आहे.

महाविद्यायमामध्ये विद्यार्थ्यांच्या सर्वांगिण विकासासाठी वेगवेगळे उपक्रम राबविले जातात. त्यामुळे एकता सामाजिक समता, बंधुत्व, स्वावलंबन इ. गुणांचा विद्यार्थ्यांमध्ये विकास झाला आहे. म्हणूनच या महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी महाराष्ट्राबरोबर देशात विविध क्षेत्रात नावलौकिक मिळवलेला आहे.

शोधप्रबंधाची प्रकरण निहाय योजना:

१. रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयाची पार्श्वभूमी

२. महाविद्यालयाची शैक्षणिक प्रगती

३. प्राचार्यांचे योगदान

४. महाविद्यालयाची 'कमवा आणि शिका योजना'

५. महाविद्यालयाची क्रिडाक्षेत्रातील कामगिरी आणि माजी विद्यार्थी संघ

६. समारोप.